K.S.S.E. BOARD BANGALORE.

S.S.L.C. EXAMINATION MODEL QUESTION PAPER

CAREERINDIA

( REGULAR PRIVATE )

# Subject - FIRST LANGUAGE -- MARATHI (08M)

Time - 3 hrs. Total questions - 64 Total marks - 125

## विभाग 'A' - गद्य पद्यांशावर आधारित.

प्रश्न - 1. खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी एका वाक्यात लिहा. 16×1=16

1) आंबेडकर कोणत्या नियतकालिकाचे संस्थापक होते?
2) आंबेडकरांनी दिवसातील किती तास अभ्यास केला?
3) निरंजन बुवाच्या मठात काकूंना काय म्हणत असत?
4) गुलजार यांचे नाव काय?
5) पक्षाघात थोडा बरा झाल्यावर फुल्यांनी कोणते अधर्वट पुस्तक लिहून पूर्ण केले?
6) 'हिमालयाची सावली' हे नाटक कोणी लिहीले आहे?
7) उत्तम कांबळेच्या आईचे नाव काय?
8) उत्तम कांबळेना रोज किती भाकरी खायला मिळे?
9) बेळगाव काँग्रेस अधिवेशनाचे अध्यक्ष कोण होते?
10) गंगुबाई हनगलांचे निधन केंव्हा झाले?
11) विरहिणी म्हणजे काय?
12) रामदेवरायाच्या दरबारात असणाऱ्या तीन कवी बंधूंची नावे काय होती?
13) 'तलवार' हा शब्द कशाला उद्देशून म्हटला आहे?
14) देश भक्ताचा धर्म कोणता?
15) अमीर गरीब कसे राहावेत?
16) वेल कोठे चढते?

प्रश्न - 2. दोन तीन वाक्यात उत्तरे लिहा. 13×2=26

17) 'अनंत शक्ती परमेश्वरु' चे तात्पर्य काय?
18) 'विद्या महासागरासारखी आहे' म्हणजे काय?
19) दुकानदाराला आश्चर्य का वाटले?
20) राखीने दिलेले झाड का वाढत नसे?
21) केशव मेश्राम यांनी कोणता मनसुबा केला होता?
22) सावित्रीबाई चार वर्षाची झाली तेंव्हा त्यांची आई काय म्हणाली?
23) उत्तम कांबळेच्या आईचा चेहरा गंभीर का झाला?
24) चांगला शकून सांगण्यासाठी ज्ञानेश्वर कावळ्याला काय काय देऊ करतात?
25) शिशुपालाच्या रक्षणासाठी कोण कोण आले आहे?
26) 'भगवंत भुकेला भक्तीचा पाहुणा' संदर्भासह स्पष्ट करा?
27) समाजसेवक कोणत्या भावनेने सेवा करतात?
28) तरुण कसा असला पाहिजे? का?
29) पृथ्वीने तप कसे केले?

www.careerindia.com

प्रश्न - 3. खालील प्रश्नांची उत्तरे पाच-सहा वाक्यात लिहा. 10×3=30

30) लेखकाने काकूंना कामावरून काढून का टाकले?

31) लेखकाने छत्री किती रुपयाला विकत घेतली? आपण छत्री दुसऱ्यासाठी विकत घेतो असे लेखक का म्हणतात?

32) खेड्यात रात्रही लवकर होते व दिवसही लवकर उगवतो. असे का म्हटले आहे?

33) तात्यांच्या घरात धुसफूस का वाढली? त्यावर त्यांनी कोणता उपाय सुचविला?

34) गंगुबाईंना कोणकोणत्या पुरस्कार व उपाध्यांनी सन्मानित केले?

35) माणसाला येणारी दुखणी आणि पाहुणे यातील साम्य कवीने कसे सांगितले आहे?

36) 'धुळीचे मला भूषण आहे' असे पृथ्वी का म्हणते?

37) हिरव्या तृणपात्याचा सत्कार का व कसा केला?

38) धरण कवितेतील स्त्रीच्या परिस्थितीचे वर्णन करा?

39) माहेरच्या वैभवाचे वर्णन कसे केले आहे?

प्रश्न - 4. खालील प्रश्नांची उत्तरे आठ ते दहा वाक्यात लिहा. 5×4=20

40) वसईमध्ये किती लाखाचा मुलुख होता? माणकर, आंजूरकर, मोरे सरदारांनी काय केले?

41) 'मदर्स युनियन' या संस्थेची माहिती द्या.

42) आदर्श गुरुशिष्याची लक्षणे लिहा.

43) 'हिरवे सपान' म्हणजे काय? ते कसे फुलते?

44) न संपणाऱ्या कष्टांची माळ कोठून जाते? स्त्रिया स्वतःला कसे समजावतात?

## विभाग 'B' - व्याकरणावर आधारित

प्रश्न - 5. खाली दिलेल्या पर्यायातून योग्य उत्तर निवडून लिहा. 10×1=10

45) 'प्रीत्यर्थ' या शब्दाचा संधी विग्रह असा होतो.

अ) प्रीती + अर्थ  ब) प्रीती + इर्थ

क) प्रीती + र्थ  ड) प्रीत्य + अर्थ

46) 'राजाने राजवाडा बांधला' हे या प्रयोगाचे उदाहरण आहे.

अ) कर्तरी  ब) कर्मणी

क) भावे  ड) या पैकी नाही

47) पुढीलपैकी भूतकाळी वाक्य हे आहे.

अ) काय छान आहे हे फूल!  ब) किती सुंदर होता तो देखावा!

क) काय सुरेल गीत गाते ती! ड) किती उंच मनोरा आहे हा!

48) चोराच्या मनात हे म्हणीतील हे या ठिकाणी असणारा शब्द.

अ) चांदणे  ब) काळोख

CAREERINDIA

क) सावकाराचे घर ड) पोलीस

49) 'प्रवास करताना त्याला खूप अनुभव आले' या वाक्याचा प्रकार हा आहे.

अ) मिश्र वाक्य ब) संयुक्त वाक्य

क) केवल वाक्य ड) आज्ञार्थी वाक्य

50) 'आधुनिक विचाराचा दृष्टीकोन असलेला' याला एक शब्द आहे.

अ) पुरोगामी ब) प्रतिगामी

क) ऊर्ध्वगामी ड) अधोगामी

51) 'तो सरसर झाडावर चढला' यातील 'सरसर' या शब्दाची जात ही आहे.

अ) क्रियापद ब) क्रियाविशेषण

क) उभयान्वयी अव्यय ड) केवलप्रयोगी अव्यय

52) पुढील शब्दातील तत्सम शब्द हा आहे.

अ) पाय ब) सासू

क) पृथ्वी ड) गाव

53) 'अनुरूप' या शब्दाचा विरुद्धार्थी शब्द हा आहे.

अ) कुरूप ब) सुरूप

क) विरूप ड) बेरूप

54) बेंगळूरचे नवीन नाव बेंगळूरू असे आहे. यातील बेंगळूरूला हे चिन्ह वापरावे.

अ) दुहेरी अवतरण ब) अर्धविराम

क) एकेरी अवतरण ड) उद्गारवाचक

प्रश्न - 6. पुढील दोन पदातील संबंध ओळखून तिसऱ्या पदाशी जुळणारा शब्द लिहा.4×1=4

55) मुलगा : सून : : दीर :

56) चातुर्मास : व्दिगु समास : : रक्तचंदन :

57) सोने : कनक : : ब्राह्मण :

58) प्रथमा : प्रत्यय नाही : : अष्टमी :

प्रश्न - 7. सूचनेप्रमाणे पुढील प्रश्न सोडवा. 3×2=6

59) 'मन प्रसन्न करणारी दुधाच्या सायीसारखी दाट शांतता पसरली होती.' अलंकार ओळखून लक्षणे सांगा.

60) 'तुजविन करुणा हे कोण जाणेल माझी' गण पाडून वृत्त ओळखा.

61) पुढील वाक्यप्रचारांचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा.

1) हस्तगत करणे

2) पानउतार करणे

www.careerindia.com

CAREERINDIA

## विभाग 'C' - रचना (लेखन) आधारित

प्रश्न - 8. 62) खालीलपैकी एका विधानाचा कल्पना विस्तार करा. 1×3=3

1) सत्य मेव जयते

2) यत्न तो देव जाणावा

प्रश्न - 9. 63) 1) योग व व्यायामाचे महत्व सांगणारे लहान भावास / बहिणीस पत्र लिहा.

किंवा 2) हायस्कूल मधील लिपिकाच्या जागेकरिता अर्ज लिहा. 1×5=5

प्रश्न - 10. 64) खालील पैकी एका विषयावर पंधरा ते वीस ओळी निंबध लिहा. 1×5=5

1) मी केलेली सहल.

2) स्वच्छ-भारत अभियान.

3) आमचे राष्ट्रीय सण.

Prepared by - shri. S. B. Gurav, Sanmati Vidya Mandir Sidanal, Tal. Chikodi Dist. Belagaum. Mob. 9980051818.

www.careerindia.com